॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

www.veerbhuminews.com


**✲ सुविचार ✲**
संगीत म्हणजे परमेश्वराने दिलेली वैभवशाली व सुंदर देणगी आहे.


▮ अहिल्यानगर ▮ बुधवार, दि. २२ एप्रिल २०२६ ▮ वर्ष ६ वे ▮ अंक ३३७ वा ▮ पाने ४ ▮ किंमत ३ रुपये ▮ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145


## फोडणी

राजू घुगरे,
शेवगाव, मो. ९४२२८५६१६४

**संप**

कार्यालयाच्या पुढे
संघटनांचा मांडव
प्रश्न मांडायला पुढे
पुन्हा तेच पांडव
बोथट झालेत सारे
मागण्या त्याच मांडून
पदाधिकारीच गबर
शासनाशी भांडून

## SPOT NEWS

### आता जमिनीची वाटणी होणार मोफत

● **मुंबई –** आता राज्यात जमिनीची वाटणी मोफत होणार आहे. जमिनीच्या वाटणीबाबत फडणवीस सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. शेतजमिनीच्या वाटणीसाठी कोणतेही नोंदणी शुल्क आकारले जाणार नाही, असा महत्त्वाचा निर्णय राज्य सरकारने जाहीर केला आहे. राज्य सरकारच्या निर्णयाने राज्यातील लाखो शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. राज्य सरकारने शेतजमिनीच्या वाटणीपत्रावर आकारले जाणारे नोंदणी शुल्क पूर्णपणे रद्द करण्याचे निर्देश जारी केले. फडणवीस सरकारच्या मंत्रिमंडळाची दिनांक २५ मे २०२५ रोजी बैठक झाली होती.

### राज्यात गारपिटीसह विजांचा कडकडाट

● **मुंबई –** सध्या राज्यात वादळ स्थिती आहे. त्यातच अरबी समुद्र व बंगालच्या उपसागरावरून येणारे बाष्पयुक्त वारे वाहत आहेत. परिणामी, राज्यात उन्हाळ्यातच पावसाळी वातावरण तयार झाले आहे. हवामान खात्याने आज मंगळवारी राज्यातील अनेक जिल्ह्यांना पावसाचा इशारा दिला आहे. भारतीय हवामान खात्याने (आयएमडी) जाहीर केलेल्या ५ दिवसांच्या अंदाजानुसार, राज्यातील विविध भागांत २४ एप्रिलपर्यंत वादळी वारे, विजांचा कडकडाट, गारपीट व पावसाची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. विशेषत: मध्य महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाडा आणि कोकण विभागातील जिल्ह्यांनी सतर्कता बाळगावी, असे आवाहन राज्य आपत्कालीन कार्य केंद्राच्या वतीने करण्यात आले आहे.

# सरकारी, निमसरकारी कर्मचारी संपावर

## जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जोरदार धरणे । जुनी पेन्शन, रिक्त पदे भरण्याच्या मागणीसाठी निर्णायक लढा

● **अहिल्यानगर । वीरभूमी –** राज्यातील सरकारी, निमसरकारी कर्मचारी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आपल्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी मंगळवार (दि. २१ एप्रिल) पासून बेमुदत संपावर गेले आहेत. अहिल्यानगर जिल्हा राज्य सरकारी, निमसरकारी कर्मचारी, मुख्याध्यापक व शिक्षक संघटना समन्वय समितीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करत शासनाच्या कामगार विरोधी धोरणाचा तीव्र निषेध नोंदविण्यात आला.

प्रलंबित १८ मागण्यांसाठी हा निर्णायक लढा असून, शासनाने तात्काळ निर्णय न घेतल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशाराही आंदोलनकर्त्यांनी दिला. विविध घोषणाबाजी करत कर्मचाऱ्यांनी आपल्या मागण्यांसाठी जोरदार निदर्शने केली.



या आंदोलनात समन्वय समितीचे निमंत्रक रावसाहेब निमसे, सरकारी कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष सुभाष तळेकर, विलास पेद्राम, वंदना नेटके, विजय काकडे, भागवत नवगण, अशोक मासाळ, शंकर जगताप, भाऊ शिंदे, वैशाली बोडखे, पुरुषोत्तम आडेप, विलास पेद्राम, संदिपान कासार, माध्यमिक शिक्षक सोसायटीचे चेअरमन आप्पासाहेब शिंदे, जुनी पेन्शन कोअर कमिटीचे राज्य सचिव महेंद्र हिंगे, माध्यमिक शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष सचिन झगडे, महाराष्ट्र माध्यमिक शिक्षक संघाचे राजेंद्र लांडे, शिक्षकेतर संघटनेचे संदीप पानमळकर, महानगर माध्यमिक शिक्षक संघाचे शहराध्यक्ष उद्धव गुंड, जीएसटी विभागाच्या वर्षा पारधी, वैभव सांगळे, दिपक चन्ने, भगवान सानप, सुषमा उमाप, सौ. सुतार, ज्योती दांगट, राहुल कोळेकर, नाड भाऊसाहेब आदींसह सरकारी, निमसरकारी कर्मचारी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. संघटनांच्या मते, पूर्वीच्या शासनकाळात दिलेली आश्वासने अद्याप पूर्ण करण्यात आलेली नाहीत. आर्थिक व सेवाविषयक प्रश्नांवर सातत्याने चालढकल केली जात असल्याने कर्मचारी वर्गात तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. शासनाचे लक्ष वेधूनही मागण्या पूर्ण होत नसल्यामुळे अखेर बेमुदत संपाचा मार्ग स्वीकारावा लागल्याचे संघटनांच्या वतीने स्पष्ट करण्यात आले. सन २०२४ मध्ये जाहीर करण्यात आलेल्या सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन संदर्भातील अधिसूचना अद्याप लागू न झाल्याने १ मार्च २०२४ नंतर निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना तात्पुरते निवृत्तीवेतनही मिळालेले नाही, ही गंभीर बाब संघटनांनी अधोरेखित केली. तसेच सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत १०:२०:३० वर्षांनंतर मिळणारे लाभ हजारो कर्मचारी व शिक्षकांना मिळालेले नाहीत. राज्यातील सुमारे ३५ टक्के पदे रिक्त असल्याने कार्यरत कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त कामाचा ताण पडत आहे. परिणामी कामकाजावर परिणाम होत असून पदोन्नती प्रक्रियाही रखडली आहे, असे आंदोलनकर्त्यांनी नमूद केले.

रावसाहेब निमसे म्हणाले की, हा संप हा केवळ मागण्यांसाठीचा संघर्ष नाही, तर कर्मचाऱ्यांच्या हक्क आणि सन्मानासाठीचा लढा आहे. अनेक वर्षांपासून आम्ही शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करत आहोत. बैठका, निवेदने, चर्चासत्रेसर्व मार्ग अवलंबूनही शासनाकडून ठोस निर्णय घेतला गेला नाही. आज कर्मचारी आर्थिक, सामाजिक आणि मानसिक ताणाखाली काम करत आहेत. रिक्त पदांमुळे कामाचा भार वाढला आहे, तर निवृत्तीनंतरही सुरक्षितता नाही. अशा परिस्थितीत कर्मचाऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी हा निर्णायक टप्पा गाठावा लागला असल्याचे त्यांनी सांगितले.

सुभाष तळेकर म्हणाले की, सरकारी कर्मचारी हा प्रशासनाचा कणा आहे. मात्र, त्याच कर्मचाऱ्यांच्या मूलभूत मागण्यांकडे शासन दुर्लक्ष करत आहे, ही दुर्दैवी बाब आहे. जुनी पेन्शन योजना हा कर्मचाऱ्यांचा हक्क आहे, तर आरोग्य विमा ही काळाची गरज आहे. कंत्राटी पद्धतीमुळे रोजगार असुरक्षित झाला आहे. अनेक कर्मचारी वर्षानुवर्षे सेवा देऊनही कायमस्वरूपी नोकरीपासून वंचित आहेत. रिक्त पदे न भरल्यामुळे कार्यरत कर्मचाऱ्यांवर प्रचंड ताण येत आहे, ज्याचा थेट परिणाम सेवांच्या गुणवत्तेवर होत आहे. हा संप म्हणजे सरकारला जाग आणण्याचा प्रयत्न आहे. आम्ही कोणत्याही प्रकारचा संघर्ष टाळू इच्छितो, परंतु शासनाने सकारात्मक प्रतिसाद दिला नाही, तर आंदोलन अधिक तीव्र केले जाणार असल्याचे ते म्हणाले.

या संपात जुनी पेन्शन योजना लागू करणे, निवृत्तीचे वय ६० वर्षे करणे, रिक्त पदे तात्काळ भरणे, कंत्राटी कर्मचाऱ्यांना कायम करणे, चतुर्थश्रेणी व वाहनचालक भरतीवरील बंदी उठवणे, सर्व कर्मचाऱ्यांसाठी कॅशलेस आरोग्य विमा योजना लागू करणे या प्रमुख मागण्या आहेत. केरळ राज्याच्या धर्तीवर ५ लाख रुपयांपर्यंत कॅशलेस आरोग्य विमा योजना महाराष्ट्रात लागू करावी, अशीही मागणी करण्यात आली आहे.

## वाढत्या तापमानामुळे ‘मेगा एल निनो’ची धास्ती

● **पुणे । वीरभूमी –** यंदाचे तापमानवाढीचे वर्ष असून एल निनोचा परिणामही दिसणार आहे. त्यामुळे या वर्षी पर्जन्यमान सरासारीपेक्षा कमी राहणार आहे. तसेच या वर्षीचा उन्हाळा अतितीव्र असण्याची शक्यता आहे. त्यातच एलनिनोबाबत तज्ज्ञांनी धोक्याचा इशारा दिला आहे.

१८७७ नंतरची सर्वात शक्तिशाली म्हणजेच मेगाएल निनोची प्रक्रिया होत आहे. १८७७ चा मेगा एल निनोच्या परिणामामुळे जगभरात उष्णतेच्या लाटा, दुष्काळ आणि साथीचे रोग पसरले होते. त्यात पृथ्वीवरील ४ टक्के लोकसंख्येचा मृत्यू झाला होता. आता, शास्त्रज्ञ इशारा देत आहेत की २०२६-२७ मध्ये त्याची पुनरावृत्ती होऊ शकते. तज्ज्ञांनी हा धोक्याचा इशारा दिल्याने चिंता वाढली आहे. तीव्र उष्णतेमुळे १४९ वर्षांपूर्वी आलेल्या ‘मेगा एल निनो’ची धास्ती पुन्हा एकदा निर्माण झाली आहे. त्या घटनेमुळे पृथ्वीवरील ४% लोकसंख्या नष्ट झाली होती. प्रशांत महासागरात ८,०४६ किलोमीटर लांबीची उष्णतेची प्रचंड लाट पसरली आहे. त्यामुळे मेगा एल निनो आणखी तीव्र झाला आहे.

शास्त्रज्ञांनी इशारा दिला आहे की २०२६-२७ मध्ये तीव्र उष्णतेची लाट येईल. दुष्काळ पडेल आणि पिकांचे नुकसान होईल. या उन्हाळ्यात देशातील तापमानात मोठी वाढ होणार आहे. मॉन्सून कमकुवत होऊ शकतो आणि दुष्काळाचा धोका निर्माण होण्याचा इशारा तज्ज्ञांनी दिला आहे. प्रशांत महासागराचे तापमान लक्षणीयरीत्या वाढत आहे. त्यामुळे एल निनो अधिक तीव्र होत आहे. याचा थेट परिणाम हिंदुस्थानातील ऋतुचक्रावर होणार आहे.

बेन नॉलसारख्या हवामानशास्त्रज्ञांच्या मते, ही लाट एल निनोला अधिक तीव्र करत आहे. वाढलेली उष्णता आणि आर्द्रता पाश्चात्य देशांमध्ये उष्णतेच्या लाटा अधिक तीव्र करू शकते. शास्त्रज्ञांच्या मते, हा पॅटर्न गेल्या १४० वर्षांतील सर्वात शक्तिशाली असू शकतो.

## शरद पवार ब्रीच कँडी रुग्णालयात

● **मुंबई । वीरभूमी –** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांना पुन्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. ते सध्या मुंबई स्थित ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल आहेत. तिथे त्यांच्या काही टेस्ट सुरू आहेत. त्या झाल्यानंतरच त्यांच्या प्रकृतीविषयीची स्पष्टता सांगता येईल अशी माहिती खासदार सुप्रिया सुळे यांनी दिली.

आज बारामती व राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीच्या प्रचाराचा शेवटचा दिवस आहे. सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्षा तथा राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची आज बारामतीत सांगता सभा आहे. या सभेला महाविकास आघाडीतर्फे स्वत: सुप्रिया सुळे हजर राहणार आहेत. स्वत: सुनेत्रा पवार यांनी त्यांना सभेचे निमंत्रण दिले आहे. या सभेची माहिती देताना सुप्रिया सुळे यांनी शरद पवारांच्या प्रकृतीची उपरोक्त माहिती दिली. त्या म्हणाल्या, शरद पवार आजच्या सांगता सभेला उपस्थित राहणार नाहीत. कारण, ते ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल आहेत. तिथे त्यांच्या काही टेस्ट सुरू आहेत. त्या झाल्यानंतरच याविषयीची स्पष्टता येईल.

सुप्रिया सुळे यांनी सध्या पक्षात विलिनीकरणाच्या मुद्यावर कोणतीही चर्चा सुरू नसल्याचेही स्पष्ट केले. त्या म्हणाल्या, या प्रकरणी माझ्या कानावर काहीही नाही. हा विषय समोर नाही.

अजितदादा होता तोपर्यंत गोष्ट वेगळी होती. आता तो नाही. गोष्टी बदलल्या आहेत. कुटुंब म्हणून नैतिक जबाबदाऱ्या घेणे ही आमची जबाबदारी आहे. माझ्या सर्वच बहिणी व भाऊ सक्षम आहेत.

# ‘गोदा ते नर्मदा’ जलयात्रेचा जलसंवर्धनाचा संदेश देत महेश्वर येथे समारोप

## जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील । २५ ते २९ एप्रिलदरम्यान यात्रा; चौंडी व त्र्यंबकेश्वरहून प्रारंभ, शिर्डीत संगम



● **अहिल्यानगर । वीरभूमी –** जलसंपदा विभागाच्या वतीने ‘जल व्यवस्थापन कृती पंधरवडा’ आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जन्मत्रिशताब्दी वर्षानिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली ‘गोदा ते नर्मदा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जलयात्रे’चे आयोजन करण्यात आले आहे. २५ ते २९ एप्रिल २०२६ दरम्यान ही यात्रा पार पडणार असून जलसंवर्धन व जल व्यवस्थापनाचा संदेश देत तिचा समारोप मध्य प्रदेशातील श्रीक्षेत्र महेश्वर येथे होणार आहे, अशी माहिती जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.

पत्रकार परिषदेत बोलताना विखे पाटील यांनी यात्रेचे सविस्तर नियोजन स्पष्ट केले. यात्रेचा शुभारंभ २५ एप्रिल रोजी श्रीक्षेत्र चौंडी आणि श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर येथून एकाच दिवशी करण्यात येणार आहे. त्र्यंबकेश्वर येथील यात्रेचा प्रारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार असून अखिल भारतीय स्वामी समर्थ गुरुपीठाचे प्रमुख अण्णासाहेब मोरे अध्यक्षस्थानी असतील. यावेळी इंदूर संस्थानच्या होळकर घराण्याचे वंशज युवराज यशवंत होळकर बहाद्दूर यांनाही निमंत्रित करण्यात आले आहे. तसेच १०८ कन्यापूजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

चौंडी येथील यात्रेचा शुभारंभ उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत आणि आमदार राम शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली होणार असल्याचेही त्यांनी सांगितले. या दोन्ही ठिकाणी राज्य मंत्रिमंडळातील सदस्य, लोकप्रतिनिधी आणि आध्यात्मिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

ही यात्रा नाशिक, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर आणि धुळे या जिल्ह्यांतून मार्गक्रमण करणार आहे. चौंडी आणि त्र्यंबकेश्वर येथून निघालेल्या दोन्ही यात्रा २६ एप्रिल रोजी शिर्डी येथे एकत्र येतील. या ठिकाणी राज्यातील ३० नदीखोऱ्यांतून आणलेले जलकलश एकत्रित करून त्यांचे पूजन केले जाईल. त्यानंतर हे जलकलश यात्रेसह महेश्वर येथे नेण्यात येणार आहेत.

‘विचार, वारसा आणि विकास’ या त्रिसूत्रीच्या आधारावर जल व्यवस्थापन अधिक प्रभावी करण्यासाठी आणि लोकसहभाग वाढवण्यासाठी या यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. जलसंपदा विभागाबरोबरच पाणी क्षेत्रातील तज्ज्ञ, सेवाभावी संस्था, शेतकरी, ग्रामस्थ व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत. यंदाचे वर्ष ‘आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष’ असल्याने महिलांचा सहभागही लक्षणीय राहणार आहे.

यात्रेदरम्यान प्रत्येक मुक्कामस्थळी आध्यात्मिक, सांस्कृतिक व जलप्रबोधनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. या यात्रेत सुमारे ५०० जलयात्री आणि विविध चित्ररथ सहभागी होणार असून सर्व लोकप्रतिनिधींना सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. तसेच ३० नदीखोऱ्यांतील जलपूजन कार्यक्रम स्थानिक लोकप्रतिनिधींच्या उपस्थितीत पार पाडण्यासाठी जलसंपदा विभागाने पुढाकार घेतल्याचे विखे पाटील यांनी सांगितले.

# SPOT NEWS

## स्व. अरुणकाका जगताप स्मृतीदिनानिमित्त भिंगारला वृक्षारोपण

● **अहिल्यानगर । वीरभूमी-**
हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने भिंगार येथील छावणी परिषदेच्या भगवान गौतम बुद्ध जॉगिंग पार्कमध्ये माजी आमदार स्व. अरुणकाका जगताप यांच्या स्मरणार्थ वृक्षारोपण अभियान राबविण्यात आले. याचबरोबर उद्यान परिसरात स्वच्छता अभियान राबवून परिसर स्वच्छ करण्यात आला. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत आणि सामाजिक बांधिलकी जपत हा उपक्रम पार पडला. स्व. अरुणकाका जगताप यांच्या पहिल्या स्मृतीदिनानिमित्त हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यांच्या कार्याची प्रेरणा घेत समाजासाठी काहीतरी सकारात्मक करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला होता. त्यांच्या सामाजिक कार्याचा वारसा पुढे नेण्याचा निर्धारही यावेळी व्यक्त करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी हरदिनचे संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ यांच्या हस्ते स्व. अरुणकाका जगताप यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर महेंद्र जाधव सर व मीनाताई परदेशी यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. या प्रसंगी निताताई देवराईकर, ज्योतीताई भिंगारदिवे, प्राजली सपकाळ, मिनाताई रासणे, जाइताई बहिरट, सुभद्राताई लंगोटे, सचिन चोपडा, सि.ए. रविंद्र कटारिया, जहिर सय्यद, सर्वेश सपकाळ, संजय भिंगारदिवे, दिलीपराव ठोकळ, दिपकराव धाडगे, अशोक पराते, संतोष लुणिया, दिपक अमृत, ताराचंद ठोकळ, विलासराव आहेर, मनोहर दरवडे, अभिनित सपकाळ, अविनाश जाधव, दिपकराव घोडके, सुधीर कपाळे, दिपक लिपाने, छोटू जाधव, सरदारसिंग परदेशी, रामनाथ गर्जे, दशरथराव मुंडे, प्रकाश देवळालीकर, मुन्ना वाघस्कर, योगेश चौधरी, सुहास देवराईकर, भरत डंगोरे, किरण शेलुकर, मेजर, संदिप जाधव, ज्ञानेश्वर धोत्रे, सुदामराव गांधले, तुषार घाडगे गुरुजी, विनोद खोत, विशाल भामरे, अनिल हळगावकर आदींसह ग्रुपचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मधुमित्र, मधुसखी पुरस्कारांसाठी नामांकन प्रक्रिया सुरू

● **अहिल्यानगर । वीरभूमी-**
महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळामार्फत सन २०२६ साठी 'मधुमित्र व मधुसखी पुरस्कार' योजनेअंतर्गत नामांकन प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. मधमाशीपालन व्यवसायात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना प्रोत्साहन देण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात येत आहे. इच्छुकांनी आपले नामांकन अर्ज दि. ८ मे २०२६ पर्यंत संबंधित जिल्हा कार्यालयात सादर करावेत, असे आवाहन मंडळामार्फत करण्यात आले आहे. मधमाशीपालन क्षेत्रात अनेक वर्षे उत्कृष्ट कार्य करणाऱ्या तीन व्यक्तींना प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाचे पुरस्कार अनुक्रमे प्रदान करण्यात येणार आहेत. यापैकी एक पुरस्कार महिलासाठी राखीव असेल. विजेत्यांना अनुक्रमे ११ हजार, ९ हजार व ५ हजार रुपये रोख रक्कम प्रदान करण्यात येणार आहे. दि. २० मे २०२६ रोजी 'जागतिक मधमाशी दिन'चे औचित्य साधून पुणे येथे आयोजित समारंभात पुरस्कार वितरण करण्यात येणार आहे. या पुरस्कारासंदर्भातील सविस्तर माहिती व अर्ज मंडळाच्या www.mskvib.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. तसेच, प्रत्येक जिल्ह्यातील खादी मंडळाच्या कार्यालयातही नामांकन अर्ज उपलब्ध आहेत. अधिक माहितीसाठी जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी यांच्याशी ०२४१-२३५३४१० या जिल्हा कार्यालयाच्या दूरध्वनी क्रमांकावर किंवा संचालनालयाच्या ०२१६८-२६०२६४ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे कळविण्यात आले आहे.

### डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनच्या नर्सिंग महाविद्यालयात

# नर्सिंग शिक्षणात ई-लर्निंग कंटेंट निर्मितीवर मार्गदर्शन

**मल्टिमिडिया, पॉडकास्ट व डिजिटल साधनांच्या वापरावर भर । ५५ शिक्षकांचा सहभाग**

● **अहिल्यानगर । वीरभूमी -**
आरोग्य शिक्षणाच्या बदलत्या प्रवाहात डिजिटल माध्यमांचा वाढता प्रभाव लक्षात घेऊन डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनच्या नर्सिंग महाविद्यालयात ई-लर्निंगसाठी विषयवस्तू निर्मिती तसेच परस्परसंवादी अध्यापनासाठी मल्टिमिडिया, पॉडकास्ट आणि डिजिटल साधनांचा प्रभावी वापर या विषयावर मार्गदर्शनपर सत्राचे आयोजन करण्यात आले. आधुनिक अध्यापन पद्धतींचे प्रशिक्षण देण्याच्या उद्देशाने आयोजित या सत्राला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.



या सत्रासाठी प्रमुख संसाधन व्यक्ती म्हणून डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनच्या कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, अहिल्यानगर येथील सहाय्यक प्राध्यापक श्री. अविनाश अ. पुंड उपस्थित होते. त्यांनी ई-लर्निंग कंटेंट तयार करताना मल्टिमिडिया साधनांचा प्रभावी वापर कसा करावा याचे सखोल मार्गदर्शन केले. व्हिडिओ, ऑडिओ, ॲनिमेशन आणि इन्फोग्राफिक्सच्या साहाय्याने अध्यापन अधिक आकर्षक व समजण्यास सुलभ करता येते, यावर त्यांनी विशेष भर दिला.

नर्सिंग शिक्षणातील क्लिनिकल संकल्पना स्पष्ट करण्यासाठी पॉडकास्ट आणि सिम्युलेशन-आधारित डिजिटल साधने उपयुक्त ठरतात, असे त्यांनी सांगितले. तसेच विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग वाढवण्यासाठी ऑनलाइन क्विझ, चर्चा, इंटरॲक्टिव्ह असाइनमेंट्स आणि फीडबॅक प्रणालींचा वापर महत्त्वाचा असल्याचे त्यांनी नमूद केले. डिजिटल प्लॅटफॉर्मच्या प्रभावी वापरामुळे शिक्षण अधिक लवचिक, सुलभ आणि परिणामकारक बनते, असेही त्यांनी स्पष्ट केले.

या प्रशिक्षण सत्रामध्ये एकूण ५५ नर्सिंग शिक्षकांनी सहभाग नोंदविला. प्रश्नोत्तर सत्रात सहभागी शिक्षकांनी विविध शंका उपस्थित करून विषयाचे सखोल आकलन करून घेतले.

कार्यक्रमासाठी वैद्यकीय संचालक डॉ. अभिजीत दिवटे तसेच डॉ. रामचंद्र पाडळकर यांनी मोलाचे सहकार्य व पाठिंबा दिला. त्यांनी नर्सिंग विभागाच्या उपक्रमाचे कौतुक करून शिक्षकांचे अभिनंदन केले.

प्राचार्य डॉ. प्रतिभा ए. चांदेकर व उपप्राचार्य डॉ. योगिता औताडे यांनी कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी विशेष प्रयत्न केले. आयोजनासाठी श्री. दिनेश मगर यांनी सहकार्य केले, तर कु. संपदा म्हस्के यांनी सूत्रसंचालनाची जबाबदारी पार पाडली.

एकूणच, या सत्रामुळे नर्सिंग शिक्षकांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने अध्यापन अधिक प्रभावी आणि विद्यार्थीकेंद्रित बनवण्यासाठी आवश्यक कौशल्ये आत्मसात करण्याची संधी मिळाली.

## शिवछत्रपती क्रीडा प्रबोधिनीमध्ये २०२६-२७ साठी प्रवेश प्रक्रिया सुरू

● **अहिल्यानगर । वीरभूमी -**
राज्यातून अधिकाधिक आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू घडविण्याच्या उद्देशाने, प्रतिभावान खेळाडूंची निवड करून त्यांना शास्त्रोक्त प्रशिक्षण, संतुलित आहार व आधुनिक क्रीडा सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य तसेच शिवछत्रपती क्रीडापीठ यांच्या अंतर्गत राज्यात विविध क्रीडा प्रबोधिनी कार्यरत आहेत. सन २०२६-२७ या वर्षासाठी शिवछत्रपती क्रीडापीठांतर्गत ९ क्रीडा प्रबोधिनींमध्ये 'सरळ प्रवेश' (४० टक्के) व 'कौशल्य चाचणी' (६० टक्के) या निकषांवर आधारित निवासी व अनिवासी प्रकारचे प्रवेश देण्यात येणार आहेत. इच्छुक खेळाडूंनी गुगल फॉर्मद्वारे २३ एप्रिल २०२६ पर्यंत अर्ज करावेत, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे यांनी केले आहे.

राज्यात पुणे, कोल्हापूर, ठाणे, अमरावती, अकोला, नाशिक, नागपूर, छत्रपती संभाजीनगर आणि गडचिरोली या ९ ठिकाणी क्रीडा प्रबोधिनींची स्थापना झाली असून, या प्रबोधिनींमध्ये क्रीडा प्रशिक्षार्थींची निवड करण्यासाठी प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.

या प्रबोधिनींमध्ये ज्युडो, जिम्नॅस्टिक्स, हॉकी, शूटिंग, फुटबॉल, जलतरण, ॲथलेटिक्स, कुस्ती, बॅडमिंटन, आर्चरी, हँडबॉल, टेबल टेनिस, व्हॉलीबॉल, सायकलिंग आणि बॉक्सिंग अशा १५ क्रीडा प्रकारांमध्ये प्रशिक्षण दिले जाते.

प्रवेश प्रक्रियेत 'सरळ प्रवेश' आणि 'कौशल्य चाचणी' असे दोन प्रकार आहेत. सरळ प्रवेश प्रक्रियेत संबंधित खेळात राज्यस्तरावर पदक प्राप्त केलेले किंवा राज्याचे प्रतिनिधित्व केलेले १९ वर्षांखालील वयोगटातील खेळाडू तज्ज्ञ समितीसमोर घेतल्या जाणाऱ्या चाचणीद्वारे पात्र ठरविले जातात.

## जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया वडगाव गुंड ते निघोज-पठारवाडी मार्गाची गुरुवारी पाहणी करणार

**रस्ता पाहणीसह अतिक्रमणावर कारवाईची शक्यता**

● **निघोज । वीरभूमी-**
जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया हे गुरुवार, दि. २३ रोजी निघोज येथे येणार असून ते वडगाव गुंड ते निघोज मार्गे पठारवाडी रस्त्याची पाहणी करणार आहेत. या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झाल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या असून त्याची दखल घेण्यात येणार असल्याची माहिती मिळाली आहे.

सध्या बेल्हा ते निघोज मार्गे जवळा, राळेगण थेरपाळ ते गव्हाणवाडी या सुमारे ५० किलोमीटर अंतराच्या रस्त्याचे काम वेगाने सुरू असून यासाठी केंद्र सरकारकडून सुमारे ३०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. गेल्या सहा महिन्यांपासून या रस्त्याचे काम सुरू आहे.

वडगाव गुंड ते निघोज-पठारवाडी हा मार्ग अत्यंत वर्दळीचा असून दिवस-रात्र हजारो वाहने या रस्त्यावरून प्रवास करतात. तसेच पाच ते सहा हजार विद्यार्थी शिक्षणासाठी या मार्गाचा वापर करतात. मात्र सध्या रस्त्याची रुंदी केवळ १० ते १२ मीटर असल्याने अपघाताचा धोका वाढला आहे. त्यामुळे हा रस्ता किमान २० ते २५ मीटरपर्यंत रुंद करावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

याशिवाय, रस्त्याच्या कामाचा दर्जा निकृष्ट असल्याच्या तक्रारी करण्यात येत आहे. कामाचा दर्जा सुधारला नाही तर अल्पावधीतच रस्ता खराब होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे, ज्यामुळे केंद्र सरकारचा मोठा निधी वाया जाण्याची भीती आहे.

रस्त्यालगत मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झाले असून रस्ता रुंदीकरण केल्यास काहींच्या घरांपर्यंत रस्ता येईल व धुळीचा त्रास होईल, या कारणावरून काही व्यापारी व स्थानिकांकडून दबाव आणला जात असल्याचेही सांगितले जात आहे. मात्र, सुरक्षिततेच्या दृष्टीने २० ते २५ मीटर रुंदी, साईड पट्टे, गटारी व पदपथ आवश्यक असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

या संदर्भात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडेही तक्रारी करण्यात आल्या असून मंत्रालयाकडून जिल्हाधिकाऱ्यांना आवश्यक सूचना देण्यात आल्याची माहिती आहे. आठ दिवसांपूर्वी जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकाऱ्यांचे पथक पाहणीसाठी पाठवण्यात आले होते. त्यांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर आता जिल्हाधिकारी स्वतः प्रत्यक्ष पाहणी करणार आहेत.

या दौऱ्यात रस्त्यावरील अतिक्रमण, कामाचा दर्जा व आवश्यक रुंदीकरण याबाबत आढावा घेतला जाणार असून अतिक्रमणधारकांवर कारवाई तसेच संबंधित ठेकेदार व अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना देण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

# चुंबळेश्वर देवस्थानच्या ४० लाखांच्या कीर्तन मंडपाचे भूमिपूजन

**पर्यटन विकास निधीतून साकार प्रकल्प । धार्मिक-सांस्कृतिक उपक्रमांना मिळणार चालना**

● **निघोज । वीरभूमी-**
नारायणगव्हाण येथील श्री क्षेत्र चुंबळेश्वर महादेव मंदिर परिसराच्या सर्वांगीण विकासाला गती देणारा महत्त्वपूर्ण उपक्रम पार पडला. पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांच्या प्रयत्नातून पर्यटन विकास निधीतून मंजूर झालेल्या सुमारे ४० लाख रुपये खर्चाच्या भव्य कीर्तन मंडप बांधकामाचे भूमिपूजन विधीवत संपन्न झाले.

या मंडपामुळे मंदिर परिसरात कीर्तन, भजन, प्रवचन तसेच विविध धार्मिक कार्यक्रमांसाठी सुसज्ज व प्रशस्त व्यवस्था उपलब्ध होणार आहे. त्यामुळे भाविकांना अधिक सोयीस्कर सुविधा मिळून येथील धार्मिक आणि सांस्कृतिक उपक्रमांना नवे बळ मिळणार आहे.

यावेळी आमदार काशिनाथ दाते म्हणाले, तालुक्यातील देवस्थानांचा विकास हा केवळ श्रद्धेचा विषय नसून तो ग्रामीण प्रगतीशी थेट संबंधित आहे. चुंबळेश्वर मंदिरासारख्या ठिकाणांचा विकास झाल्यास भाविकांची संख्या वाढेल, स्थानिकांना रोजगाराच्या संधी निर्माण होतील आणि गावाच्या आर्थिक-सामाजिक विकासाला चालना मिळेल. पर्यटन विकासाच्या माध्यमातून परंपरा व संस्कृती जपत विकास साधण्याचा आमचा प्रयत्न कायम राहील.



या प्रसंगी सुनील थोरात, बाळासो कळमकर, सुरेश बोरुडे, संतोष गायकवाड, खिंवसरा काका, सहादू शेळके, बंडोपंत नाईक, तारा दरेकर, संजय शेळके, दादासाहेब शेळके, विकास पवार, हुसेन शेख, गणेश शेळके, हेमंत कांडेकर, सौ. मनीषा जाधव, सविता भोसले, श्रीमती अनुसया कांडेकर, अण्णा चव्हाण, बाळासाहेब चव्हाण, भरत भोसले, मेजर काशिनाथ नवले, प्रताप अंबुले, सौ. उषा संजय शेळके, सौ. कामिना विकास पवार आदी मान्यवर तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

भूमिपूजन सोहळ्यामुळे नारायणगव्हाण गावात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून या प्रकल्पामुळे चुंबळेश्वर मंदिर परिसर अधिक आकर्षक व सुविधायुक्त होणार असल्याने भाविकांमध्ये समाधान व्यक्त करण्यात आले.

> आमदार काशिनाथ दाते यांनी नारायणगव्हाणसारख्या ग्रामीण भागातील देवस्थानाच्या विकासासाठी घेतलेला पुढाकार कौतुकास्पद आहे. चुंबळेश्वर मंदिरासाठी कीर्तन मंडप उभारणीमुळे भाविकांना मोठी सुविधा मिळणार आहे. त्यांनी केवळ आश्वासने न देता प्रत्यक्ष कामातून विकास घडवून आणला आहे, याचे समाधान वाटते. त्यांच्या या कामामुळे गावाच्या धार्मिक व पर्यटनदृष्ट्या प्रगतीला निश्चितच चालना मिळेल. पुढील काळातही अशाच पद्धतीने विकासकामे सुरू राहतील, असा विश्वास आहे.
>
> **- सुरेश बोरुडे,** माजी सरपंच, नारायणगव्हाण

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर- ४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

SPOT NEWS

## प्रधानमंत्री इंटर्नशिप योजनेचा लाभ घेण्यासाठी युवकांना आवाहन

**अहिल्यानगर । वीरभूमी-**
राज्यातील युवक-युवतींना उद्योग क्षेत्रात रोजगारक्षम बनविण्यासाठी पंतप्रधान रोजगार व कौशल्य विकास पॅकेजअंतर्गत 'प्रधानमंत्री इंटर्नशिप योजना' सुरू करण्यात आली आहे. पुढील पाच वर्षांत एक कोटी तरुणांना इंटर्नशिपची संधी देण्याचे उद्दिष्ट असून, केंद्र शासनाने सुमारे दोन हजार कंपन्यांशी करार केले आहेत. इच्छुक उमेदवारांनी नोंदणी करून योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहायक आयुक्त योगेश उगले यांनी केले आहे. या योजनेत सहभागी होणाऱ्या प्रशिक्षणार्थी (इंटर्न) यांना रुजू होताना एकरकमी ६ हजार रुपये तसेच पुढील नऊ महिन्यांसाठी दरमहा ९ हजार रुपये देण्यात येणार असून, एकूण ८७ हजार रुपये इतके अनुदान मिळणार आहे. पूर्णवेळ शिक्षणात किंवा नोकरीत नसलेले बेरोजगार युवक-युवती या योजनेसाठी पात्र असून, वयोमर्यादा २१ ते २४ वर्षे निश्चित करण्यात आली आहे. जिल्ह्यातील एकूण २१७ पदांसाठी संधी उपलब्ध आहे. तसेच महाराष्ट्रासह देशातील नामांकित कंपन्यांमध्ये इंटर्नशिपची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. योजनेत सहभागी होण्यासाठी व अधिक माहितीसाठी https://pminternship.mca.gov.in या संकेतस्थळाला भेट देऊन शैक्षणिक पात्रतेनुसार व आवडीच्या क्षेत्रानुसार अर्ज करावा.

## ससून डॉक कुलाबा ऑक्सनरचे अध्यक्ष राजूशेठ वराळ यांचे निधन

**निघोज । वीरभूमी-**

सहकारमहर्षी कै. किसनराव वराळ पाटील यांचे चिरंजीव तसेच मुंबई येथील ससून डॉक कुलाबा ऑक्सनर असोसिएशनचे अध्यक्ष उद्धव उर्फ राजूशेठ (नाना) वराळ (वय ६७ वर्षे) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. सुमारे चाळीस वर्षांपासून ते मुंबईतील कुलाबा मच्छी बंदरात व्यवसाय करत होते. मुंबईतील कुलाबा तसेच निघोज व परिसरात सामाजिक, धार्मिक व शैक्षणिक क्षेत्रात त्यांचे मोठे योगदान राहिले आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, चार विवाहित मुली, जावई, भाऊ, बहिणी, पुतणे, भाचे, सुना व नातवंडे असा मोठा परिवार आहे. सहकारमहर्षी किसनराव वराळ पाटील डी. फार्मसी व बी. फार्मसी कॉलेजचे संस्थापक अध्यक्ष रंगनाथ वराळ पाटील यांचे ते धाकटे बंधू तर संदीप पाटील वराळ जनसेवा फाउंडेशनचे तालुकाध्यक्ष सचिन पाटील वराळ व मुंबईतील व्यावसायिक सुनील वराळ पाटील यांचे ते चुलते होत. राजूशेठ वराळ यांनी गेल्या चार दशकांत कुलाबा परिसरात व्यवसायाच्या माध्यमातून भक्कम स्थान निर्माण केले होते. असोसिएशनच्या माध्यमातून त्यांनी मच्छीमार व्यावसायिकांचे प्रश्न सोडविण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले. तसेच गरजू कुटुंबांना रोजगार उपलब्ध करून देण्यातही त्यांनी मोलाचे योगदान दिले. दिलदार स्वभावामुळे दिलदार माणूस अशी त्यांची ओळख होती. त्यांच्यावर निघोज येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी पारनेर, शिरूर तसेच मुंबई परिसरातील मित्रपरिवार, नातेवाईक, आप्तेष्ट व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# टंचाई असलेल्या ठिकाणचे टँकर प्रस्ताव तातडीने पाठवा

### जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया । पाथर्डी तहसील कार्यालयात टंचाई आढावा बैठक

**पाथर्डी । वीरभूमी -**
पाणीटंचाईचा काळ सुरू झाल्याने टँकरसाठी कोणाच्या शिफारशीची वाट न पाहता, ज्या ठिकाणी टंचाई आहे त्या ठिकाणचे टँकर प्रस्ताव तातडीने पंचायत समिती व तालुका महसूल प्रशासनाकडे सादर करावेत, असे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिले.



पाथर्डी तहसील कार्यालयात जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांच्या अध्यक्षतेखाली शेवगाव-पाथर्डी तालुक्यातील पाणीटंचाईची आढावा बैठक पार पडली. त्याप्रसंगी डॉ. आशिया बोलत होते. यावेळी प्रांताधिकारी प्रसाद मते, तहसीलदार डॉ. उद्धव नाईक, शेवगावचे प्रभारी तहसीलदार निलेश वाघमारे, शेवगावच्या गटविकास अधिकारी सोनल शहा, नायब तहसीलदार किशोर सानप, रवींद्र शेकटकर, मुख्याधिकारी संतोष लांडगे, सहायक कृषी अधिकारी वैभव थोरे तसेच तालुक्यातील सर्व विभागप्रमुख, तलाठी व ग्रामविकास अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. आशिया म्हणाले, प्रांताधिकाऱ्यांना टँकर मंजुरीचे अधिकार देण्यात आले आहेत. त्यामुळे प्रस्ताव तातडीने सादर करावेत. दिलेल्या पिण्याच्या पाण्याची तपासणी आरोग्य विभागाने दररोज करावी व यासाठी कर्मचारी नियुक्त करावेत. ग्रामसेवक व तलाठी यांनी याबाबत सतर्क राहावे.

दोन्ही तालुक्यांत ज्या ठिकाणी पाणीसाठा आहे, तेथे वीजपंपाची अनधिकृत वीजजोडणी तत्काळ खंडित करण्याचे निर्देश वीज वितरण कंपनीला देण्यात आले. पाण्याचा अनधिकृत उपसा होणार नाही याची जबाबदारी वीज वितरण कंपनी, जलसंधारण विभागाचे अधिकारी व संबंधित संस्थांनी घ्यावी, असे निर्देशही जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी दिले.

पशुधनासाठी लागणाऱ्या चाऱ्याचे आणि पाण्याचे नियोजन करण्यात आले असून, टंचाईकाळात व त्यानंतरही पाण्याचा अवैध उपसा रोखण्यासाठी सर्व विभागांनी दक्षता घ्यावी. तलावातील पाणीउपसा तत्काळ बंद करावा, अन्यथा संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात येईल. टँकर भरतानाचे आणि रिकामा करतानाचे फोटो आवश्यक असून, तपासणीवेळी हे फोटो सादर करणे बंधनकारक राहील. नियमांचे पालन न केल्यास कारवाई करण्यात येईल. टंचाईकाळात सर्वांनी विशेष खबरदारी घेण्याच्या सूचनाही जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी दिल्या.

बैठकीच्या प्रास्ताविकात तहसीलदार डॉ. उद्धव नाईक यांनी माहिती दिली, तर प्रांताधिकारी प्रसाद मते यांनी आभार मानले. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांच्या हस्ते मंडळ अधिकारी व तलाठ्यांना लॅपटॉप व इतर साहित्याचे वितरणही करण्यात आले.

## एल-निनोच्या पार्श्वभूमीवर जिल्हा पशुसंवर्धन विभाग सतर्क!

**अहिल्यानगर । वीरभूमी-**
भारतीय हवामान विभागाच्या अंदाजानुसार एल-निनोमुळे २०२६ च्या मान्सूनवर प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता लक्षात घेऊन राज्यातील पशुधन संरक्षण व संभाव्य चारा टंचाई टाळण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याचे निर्देश देण्यात आले असून जिल्हा चारा सुरक्षा आराखडा तयार करण्याचे आदेश देण्यात आले आहेत, अशी माहिती पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील यांनी दिली.

राज्यात सरासरी पर्जन्यमानात घट होण्याची शक्यता असून हिरव्या चाऱ्याचे प्रमाण कमी होऊन टंचाई निर्माण होऊ शकते. या पार्श्वभूमीवर प्रत्येक जिल्ह्याने जिल्हा नियोजन व विकास समितीमार्फत नियोजन करून चारा टंचाईवर मात करण्यासाठी आवश्यक उपाययोजना राबवाव्यात, असे निर्देश देण्यात आले आहेत. मका, ज्वारी व बाजरीसारख्या चारा पिकांचे उत्पादन वाढविणे तसेच राज्य चारा विकास महामंडळ, अकोला यांच्या माध्यमातून चाऱ्याची उपलब्धता वाढविण्यावर भर देण्यात येणार आहे.

४ मे २०२६ पूर्वी आदेश शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याचे नियोजन करण्यात येत असून चारा उत्पादन वाढीसाठी शाश्वत शेती पद्धती, हायड्रोपोनिक पद्धतीने चारा उत्पादन, टीएमआर व कडबाकुट्टी यांसारख्या उपाययोजना राबविण्यात येणार आहेत.

जिल्हाधिकाऱ्यांनी जिल्ह्यातील पशुधन संख्या लक्षात घेऊन स्वतंत्र जिल्हा चारा सुरक्षा आराखडा तयार करावा, यामध्ये नवीन पाणलोट क्षेत्रांमध्ये चारा लागवडीसाठी विशेष मोहिम राबविणे, टंचाईच्या काळात चारा उपलब्धतेसाठी उपाययोजना करणे व भविष्यातील टंचाई टाळण्यासाठी चारा साठवणुकीचे नियोजन करणे अपेक्षित आहे.

पशुसंवर्धन विभागाने जिल्हा उपआयुक्त व स्थानिक प्रशासनाच्या समन्वयाने या मोहिमेला प्राधान्य दिले असून पशुपालकांनी शासनाच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करून उपलब्ध योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## एस. एस. जी. एम. महाविद्यालयात इयत्ता ११ वी विज्ञान पालक मेळावा उत्साहात

**कोपरगाव । वीरभूमी-**
रयत शिक्षण संस्थेचे श्री सद्गुरु गंगागीर महाराज सायन्स, गौतम आर्ट्स अँड संजीवनी कॉमर्स महाविद्यालयाच्या कनिष्ठ विभागातील विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांच्या पालकांचा मेळावा प्राचार्य डॉ. माधव सरोदे यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात संपन्न झाला.



अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. सरोदे यांनी महाविद्यालयातील एआय सेंटर, माजी विद्यार्थी संघटना, नवीन शैक्षणिक धोरण (छएझ २०२०), विविध उपक्रम, 'वर्ल्ड रेकॉर्ड - वर्ल्ड ऑन डेंटल हायजिन', पोलीस भरती मार्गदर्शन, शॉर्ट टर्म कोर्सेस, गुणवत्ता कक्ष, तसेच व्यावसायिक करिअरच्या संधी याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. विद्यार्थी-केंद्रित शिस्तीचे महत्त्व अधोरेखित करत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांच्या कलागुणांना वाव दिला जातो, असे त्यांनी सांगितले. तसेच इयत्ता १२ वीतील विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य श्री. संजय शिंदे यांनी केले. त्यांनी महाविद्यालयातील विविध उपक्रम व शिस्तीचे महत्त्व स्पष्ट केले. यावेळी उपस्थित पालकांचे स्वागत करण्यात आले. विविध स्पर्धांमध्ये यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा पालकांसमवेत गुणगौरव करण्यात आला.

मेळाव्यास पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिक्षकीय मनोगतात सौ. दिघे, श्री. ठोंबरे, श्रीमती फुलपगार व श्रीमती फोपसे यांनी पालकांना मार्गदर्शन केले. त्यानंतर श्री. संतोष खांडेकर, राहुल कासार, सौ. अनिता भोसले व धनश्री हसवाल या पालकांनी सूचना व अभिप्राय मांडले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सुनिता अत्रे यांनी केले, तर आभार प्रदर्शन पर्यवेक्षक श्री. कळमकर यांनी मानले. हा पालक मेळावा विद्यार्थ्यांना यशाच्या दिशेने वाटचाल करण्यासाठी प्रेरणादायी ठरला.

# समवेदना, प्रेम व माणुसकीतूनच धर्म-अध्यात्माची खरी अभिव्यक्ती

### डॉ. अभय बंग । स्नेहालयतर्फे 'बा, बापू, विनोबा' व आदर्श शिक्षक पुरस्कारांचे वितरण

**अहिल्यानगर । वीरभूमी-**
समवेदना, प्रेम आणि माणुसकीने प्रेरित कृती हीच धर्म आणि अध्यात्माची खरी अभिव्यक्ती असते. द्वेष व उन्मादातून उद्भवणारी हिंसा भारतीय संस्कृतीसह जगातील सर्व धर्म व अध्यात्मिकतेचा विनाश घडवते, असा इशारा ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते व विचारवंत डॉ. अभय बंग यांनी येथे दिला.

स्नेहालय संस्थेतर्फे वर्ष २०२५-२६ चे 'बा, बापू, विनोबा' आणि आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आले. यावेळी पद्मश्री डॉ. अभय बंग, माजी मंत्री बाळासाहेब थोरात, सीएसआरडी संस्थेचे संचालक डॉ. सुरेश पठारे तसेच औद्योगिक विकास मार्गदर्शक अरविंद पारगावकर उपस्थित होते. महाराष्ट्रातील विविध भागांतून ३०० हून अधिक सामाजिक कार्यकर्ते या कार्यक्रमासाठी उपस्थित होते.

प्रमुख वक्ते म्हणून डॉ. बंग म्हणाले की, वंचितांची सेवा करताना स्वतःचा, स्वधर्माचा आणि ईश्वराचा शोध लागतो. कस्तुरबा गांधी, महात्मा गांधी आणि विनोबा भावे यांच्या विचारांचा उल्लेख करत त्यांनी सांगितले की, केवळ सत्तेचा वापर किंवा आर्थिक मदतीने कायमस्वरूपी सामाजिक बदल घडत नाही. प्रेम, करुणा, माणुसकी आणि अहिंसक संवाद यांच्याद्वारेच समाज आणि जग वाचवता येईल.

पुरस्कारप्राप्त संस्थांनी समाजातील सर्वात वंचित घटकांचा विचार करून कार्य केले असून त्यांच्या कामातून गांधी-विनोबांचे विचार प्रकर्षाने दिसून येतात, असेही त्यांनी नमूद केले.

बाळासाहेब थोरात यांनी सांगितले की, महाराष्ट्रातील संत व समाजसुधारकांची परंपरा काही संस्थांनी निष्ठेने जपली आहे. गेली चार दशके कार्यरत असलेली स्नेहालय संस्था त्यात अग्रस्थानी आहे. लैंगिक शोषित महिला, एड्सबाधित, बालवधू, अनाथ मुले, मानसिक आरोग्य व पर्यावरण यांसारख्या प्रश्नांवर स्नेहालयने प्रभावी काम केले आहे.

प्रास्ताविकात संस्थेच्या सचिव डॉ. प्रीती भोम्बे यांनी सांगितले की, स्नेहालय पुरस्कारप्राप्त संस्थांना देणगीदार व संसाधनांशी जोडून त्यांच्या सक्षमीकरणासाठी कार्य करते. सेवा संवर्धन कार्यशाळांद्वारे संस्थांच्या शाश्वतीकरणालाही हातभार लावला जातो. १९९५ पासून आतापर्यंत ६०० हून अधिक संस्था व कार्यकर्त्यांना प्रोत्साहन देण्यात आले आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. स्वाती रानडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन संस्थेच्या अध्यक्षा जयाताई जोगदंड यांनी मानले.

'बा' (कस्तुरबा गांधी) पुरस्काराने हावडा (प. बंगाल) येथील समरिटन हेल्प मिशनच्या सहसंस्थापिका शबाना मामुन अख्तर यांना सन्मानित करण्यात आले. त्यांनी गेल्या तीन दशकांत बालकांचे शिक्षण व महिलांच्या रोजगारासाठी उल्लेखनीय काम केले आहे.

'बापू' (महात्मा गांधी) पुरस्कार तळकोकणातील 'जीवन आनंद' संस्थेचे संस्थापक सौ. भक्ती व संदीप परब यांना देण्यात आला. त्यांनी २० वर्षांत १० हजारांहून अधिक मनोरुग्ण, अनाथ व निराधार व्यक्तींचे पुनर्वसन केले आहे.



'विनोबा' पुरस्कार बीड जिल्ह्यातील आर्वी येथील शांतीवन प्रकल्पाचे संस्थापक सौ. कावेरी व दीपक नागरगोजे यांना प्रदान करण्यात आला. त्यांनी ऊसतोड कामगारांच्या मुलांच्या शिक्षणासाठी तसेच दुष्काळी भाग जलसमृद्ध करण्यासाठी उल्लेखनीय कार्य केले आहे.

आदर्श शिक्षक पुरस्काराने पुणे जिल्ह्यातील दत्तात्रय वारे, नगरमधील सचिन वैजनाथ वाघ तसेच चंद्रकला कराळे यांचा गौरव करण्यात आला.

'बा, बापू, विनोबा' पुरस्कार प्रत्येकी ५० हजार रुपये, तर आदर्श शिक्षक पुरस्कार १० हजार रुपयांचा आहे. यामध्ये सन्मानपत्र, स्मृतिचिन्ह व पुस्तके देण्यात आली.

या पुरस्कारांसाठी पुणे येथील स्व. इंदिरा मोरे व माजी आमदार श्यामकांत मोरे तसेच शिक्रापूर येथील स्व. सीताबाई व रावसाहेब मांढरे यांच्या कुटुंबीयांनी आर्थिक सहकार्य केले.

# रस्त्यावरील आठवडे बाजार हटवून वाहतूक कोंडी दूर करा

## मनसे व बाजारकरी मंडळाचे पाथर्डी पालिकेला निवेदन | अन्यथा कर न भरण्याचा दिला इशारा

**● पाथर्डी | वीरभूमी –**
शहरातील आठवडे बाजार दर बुधवारी भरतो. वसंतराव नाईक पुतळा ते संस्कार भवन चौक या रस्त्यावर व्यापारी व अन्य शेतकरी मालविक्रीसाठी बसतात. यामुळे वाहतूक विस्कळीत होण्याबरोबरच बाजारतळावर बसलेल्या मूळ बाजारकरूंना विविध समस्यांना तोंड द्यावे लागते. याबाबत पालिकेने तातडीने दखल घेऊन संपूर्ण रस्ता मोकळा ठेवत सर्व व्यापाऱ्यांना बाजारतळामध्ये बसण्याबाबत आदेश द्यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. अन्यथा बाजारकरी बाजारकराची कुठलीही पावती देणार नाहीत, असा इशारा महाराष्ट्र नवनिर्माण सेना व बाजारकरी मंडळाच्या वतीने देण्यात आला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, पाथर्डीचा आठवडे बाजार दर बुधवारी असला तरी नोकरदार वर्ग व शेतकऱ्यांच्या सोयीसाठी रविवारीही भाजी बाजार भरतो. त्यामुळे अलीकडील काळात रविवार व बुधवार असे दोन दिवस बाजारतळावर बाजार भरू लागला आहे. मढी, माणिकदौंडी परिसरातून मोहटादेवीकडे व शहरात येणारी वाहने कमी अंतराचा व सुस्थितीत दुपदरी रस्ता असल्याने संस्कार भवन चौकातून शहरात प्रवेश करतात.

मात्र, या रस्त्याच्या दोन्ही बाजूंना भाजीविक्रेते व व्यापाऱ्यांची वाहने पार्क केलेली असल्याने बुधवारी दिवसभर व रविवारी दुपारपर्यंत हा रस्ता वाहतुकीसाठी अघोषितपणे बंदच असतो. जुन्या बसस्थानकावरून माणिकदौंडी-मढीकडे जाण्यासाठी नगर रस्त्याने अर्धा किलोमीटर जाऊन पुन्हा माणिकदौंडी रस्त्याने वळसा घ्यावा लागतो. यामुळे नागेबाबा चौकात किरकोळ अपघातांचे प्रमाण वाढले आहे.

सुरक्षेच्या दृष्टीने संस्कार भवन चौकापासून नाईक पुतळा व अजंठा चौकाकडे जाणारा रस्ता नेहमी मोकळा असणे अत्यंत आवश्यक आहे. मात्र पालिकेचे दुर्लक्ष व पोलीस प्रशासनाची उदासीनता यामुळे नागरिकांना जीव मुठीत धरून वावरावे लागत आहे. विशेष म्हणजे बाजारतळ निम्म्याहून अधिक मोकळा असतानाही विक्रेते व घाऊक व्यापारी रस्त्यावरच पथारी मांडतात, त्यामुळे वाहतूक कोंडी अधिक वाढते.

याचा फटका माणिकदौंडी चौकातील रहिवाशांनाही बसत आहे. पालिकेमध्ये अतिक्रमणविरोधी पथक असूनही कारवाई होत नाही. शहर पोलिसांचे पथक असतानाही परिस्थिती बदललेली नाही. बुधवारी तर नगराध्यक्षांनाही पालिकेतून घरी जाण्यासाठी दुचाकी किंवा पायी जावे लागते. अधिकाऱ्यांच्या वाहनांनाही पालिका कार्यालयासमोर पोहोचताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो.

यापूर्वी विविध संघटना व कार्यकर्त्यांनी निवेदने दिली, मात्र पालिका प्रशासनाने त्याची दखल घेतलेली नाही. याच रस्त्यावर गुरुकुल इंग्लिश मीडियम स्कूल तसेच गुगळे बाल रुग्णालय असून रुग्णांना पहाटेपासूनच लाऊडस्पीकर व वाहतूक कोंडीचा त्रास सहन करावा लागतो.

ही शहरातील गंभीर समस्यांपैकी एक असूनही संबंधित पदाधिकारी केवळ सवंग लोकप्रियतेसाठी याकडे गांभीर्याने पाहत नाहीत, अशी टीका करण्यात आली आहे. बाजारतळावर व्यापाऱ्यांना बसवण्याची शिस्त लावण्याची जबाबदारी पालिका प्रशासन पार पाडत नसल्याचेही निदर्शनास आणून देण्यात आले.



महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे तालुकाध्यक्ष संतोष जिरेसाळ, जिल्हाध्यक्ष अविनाश पालवे, शहराध्यक्ष संदीप काकडे तसेच बाजारकरी मित्र मंडळाचे संघटक मुकुंद लोहिया, अनिल काटे, विनोद खटावकर, मोहन कुसळकर, एकनाथ भंडारी, मनोज डोळस आदींनी नगराध्यक्ष अभय आव्हाड यांना निवेदन दिले.

या निवेदनात म्हटले आहे की, बाजाराच्या दिवशी व्यापारी व शेतकरी रस्त्यावर बसल्यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होतो आणि नागरिकांना मोठ्या समस्यांना सामोरे जावे लागते. बाजारतळामध्ये मुबलक जागा उपलब्ध असतानाही पालिकेचे नियोजन कमी पडत असल्याने व्यापारी रस्त्यावरच बाजार भरवतात. याचा परिणाम बाजारतळावर बसणाऱ्या नियमित व्यापाऱ्यांच्या व्यवसायावरही होत आहे.

तसेच पावती वसूल करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा धाक नसल्याने व्यापारी बाहेर बसतात. त्यामुळे पालिका प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन रस्त्यावरील बाजार बाजारतळात हलवावा, अन्यथा मनसे व बाजारकरी मंडळाच्या वतीने बाजारतळावरील व्यापारी कर भरण्यास नकार देतील. बाहेरील व्यापारी बाजारतळात बसत नाहीत तोपर्यंत कर न भरण्याचे आंदोलन सुरू ठेवण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

# महिला हिताच्या निर्णयांना विरोध करणाऱ्यांचा खरा चेहरा उघड

## महिला आरक्षण विधेयकावरून विरोधकांवर विखे पाटील यांची टीका

**● अहिल्यानगर | वीरभूमी –**
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकारने संसदेत मांडलेल्या महिला आरक्षण विधेयकामागील भूमिका अत्यंत शुद्ध होती. मात्र या विधेयकाला विरोध करून विरोधी पक्षांनी आपला महिला-विरोधी चेहरा देशासमोर आणला, अशी टीका जलसंपदा तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केली.



महिला आरक्षण विधेयकाच्या समर्थनार्थ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्यभर एक कोटी सह्या गोळा करण्याचा उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच विविध ठिकाणी मेळावे घेऊन काँग्रेस, शरद पवार गट, उद्धव ठाकरे गट, तृणमूल काँग्रेस आणि द्रमुक या पक्षांनी महिला आरक्षण विधेयकाला कसा विरोध केला, हे जनतेसमोर मांडले जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

विरोधकांच्या टीकेला उत्तर देताना विखे पाटील म्हणाले की, २०२३ साली याच पक्षांनी महिला आरक्षण विधेयक जनगणना आणि मतदारसंघ पुनर्रचनेनंतर लागू करण्यास मान्यता दिली होती. मात्र सध्याच्या राजकीय परिस्थितीत दोन-तृतीयांश बहुमताचा प्रश्न निर्माण होताच त्यांनी आपली भूमिका बदलली आहे.

राज्यात महायुती सरकारने सुरू केलेल्या 'लाडकी बहीण' योजनेलाही याच पक्षांनी विरोध केला. ही योजना बंद पाडण्यासाठी न्यायालयात जाण्याचाही प्रयत्न करण्यात आला होता. त्यामुळे महिलांच्या हिताच्या योजनांना विरोध करणाऱ्यांकडून वेगळी अपेक्षा ठेवणे चुकीचे ठरेल, असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

# संगमनेरमध्ये बांधकाम कामगारांची आरोग्य तपासणी

## १५० कामगारांची तपासणी; 'स्क्रीनिंग ते उपचार' संकल्पनेतून आरोग्य जागरूकतेला चालना

**● संगमनेर | वीरभूमी –**
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या वतीने संगमनेर येथील मातोश्री लॉन्स येथे बांधकाम कामगारांसाठी भव्य मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. कष्टाने इमारती उभ्या करणाऱ्या आणि स्वतःच्या आरोग्याकडे अनेकदा दुर्लक्ष करणाऱ्या कामगारांसाठी हे शिबिर मोठा आधार ठरले. शिबिराचे उद्घाटन आमदार अमोल खताळ-पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.



बांधकाम क्षेत्रात काम करताना धूळ, ऊन, पाऊस आणि प्रचंड शारीरिक कष्ट यामुळे कामगारांना विविध आरोग्य समस्यांना सामोरे जावे लागते. या पार्श्वभूमीवर 'गावोगावी पोहोचून शेवटच्या कामगारापर्यंत वैद्यकीय सुविधा पोहोचवणे' या उद्देशाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

दिवसभर चाललेल्या या शिबिराला कामगारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. परिसरातील मोठ्या संख्येने महिला व पुरुष कामगारांनी आपल्या आरोग्याची तपासणी करून घेतली. एकूण १५० कामगारांची रक्त तपासणी करण्यात आली, तर ७० ते ८० गरजू कामगारांना मोफत औषधांचे वाटप करण्यात आले. सर्वसाधारण आरोग्य तपासणीबरोबरच लिव्हर (यकृत) तपासणीसह इतर आवश्यक वैद्यकीय चाचण्या करण्यात आल्या.

शिबिरात आरोग्य विभागाची तज्ज्ञ टीम उपस्थित होती. जिल्हा समन्वय अधिकारी (बांधकाम कामगार विभाग) सविता आढाव, डॉ. तेजल गाडेकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी अत्यंत तत्परतेने तपासण्या करून कामगारांना आरोग्याबाबत मार्गदर्शन केले.

यावेळी बोलताना सविता आढाव यांनी 'स्क्रीनिंग ते उपचार' या संकल्पनेवर प्रकाश टाकला. त्या म्हणाल्या, रोगाचे लवकर निदान करून त्यावर योग्य वेळी उपचार मिळणे, हा या उपक्रमाचा मुख्य हेतू आहे. या अंतर्गत एकूण ३२ प्रकारच्या विविध तपासण्या केल्या जातात.

बांधकाम कामगार हा समाजाचा कणा असूनही आरोग्याच्या बाबतीत ते अनेकदा दुर्लक्षित राहतात. अशा शिबिरांच्या माध्यमातून त्यांच्यात आरोग्याबाबत जागरूकता निर्माण होत असून या उपक्रमामुळे कामगारांमध्ये समाधानाचे वातावरण दिसून आले.

# कमी दाबाच्या वीजपुरवठ्यामुळे मोहोज देवढे ग्रामस्थ आक्रमक; ट्रान्सफॉर्मरचा प्रश्नही गंभीर

## शेती व आरोग्यावर परिणाम | प्रशासनाने तातडीने दखल घ्यावी अन्यथा सरकारच्या पुतळ्याची प्रेतयात्रा काढण्याचा इशारा

**● पाथर्डी | वीरभूमी–**
तालुक्यातील मोहोज देवढे येथील ग्रामस्थांनी सततच्या कमी दाबाच्या वीजपुरवठ्यामुळे त्रस्त होऊन राज्य सरकारविरोधात आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे. गुरुवार, दि. २३ एप्रिल रोजी ग्रामपंचायत कार्यालयातून राज्य सरकारच्या प्रतीकात्मक पुतळ्याची प्रेतयात्रा काढून हनुमान मंदिरासमोर अंत्यसंस्कार करण्यात येणार असल्याची माहिती निवेदनाद्वारे देण्यात आली आहे.

यासंदर्भात कार्यकारी अभियंता लक्ष्मण काकडे यांना सादर करण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की, गावातील वस्त्यांवर सिंगल फ्यूज योजनेअंतर्गत वीजजोड व मीटर उपलब्ध असूनही गेल्या अनेक महिन्यांपासून अत्यल्प दाबाने वीजपुरवठा होत आहे. सध्या वाढलेल्या उष्णतेच्या पार्श्वभूमीवर पंखेही चालत नसल्याने नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. बाहेर झोपल्यास वन्यप्राण्यांचा धोका, तर घरात राहिल्यास उष्माघाताचा धोका निर्माण होत असल्याचे ग्रामस्थांनी नमूद केले आहे. विशेषतः दमा व हृदयविकाराने ग्रस्त वृद्धांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. दरम्यान, भटेवाडी क्रमांक दोनसाठी मंजूर करण्यात आलेला अतिरिक्त ट्रान्सफॉर्मर अन्यत्र हलविण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे शेतीसाठी आवश्यक वीजदाब मिळत नसल्याने पंपसेट्स बंद ठेवावे लागत असून पिकांचे मोठे नुकसान होत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. मागील तीन वर्षांपासून झालेल्या नुकसानीची भरपाई देऊन संबंधित





ट्रान्सफॉर्मर तातडीने उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच, खारवणी येथील ट्रान्सफॉर्मरवर वाढलेल्या भारामुळे तो वारंवार जळत असून शेतकऱ्यांना स्वखर्चाने दुरुस्ती करावी लागत असल्याची तक्रारही करण्यात आली आहे. वीजेअभावी पिकांचे नुकसान होत असल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. या सर्व प्रश्नांकडे प्रशासनाने तातडीने लक्ष द्यावे, अन्यथा आंदोलन तीव्र करण्यात येईल, असा इशाराही ग्रामस्थांनी दिला आहे. निवेदनावर राजेंद्र देवढे, माजी सरपंच गणेश चितळकर, गोविंद वाघमोडे व कडूबाळ चितळकर यांच्यासह अनेक नागरिकांच्या सह्या आहेत. याबाबतचे निवेदनाची प्रत उपकार्यकारी अभियंता मयूर जाधव यांना देण्यात आली आहे.

### नाराळाच्या झाडावर कोसळली वीज

■ आज सकाळी तालुक्यातील बहिरवाडी येथे नारळाच्या झाडावर वीज पडल्याने नागरिकांत भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. रात्री वीजपुरवठा खंडीत झाल्याने येथील ग्रामस्थ बापूराव महारनोर हे त्यांच्या नातवंडासोबत याच नारळाच्या झाडापासून दहा-बारा फूट अंतरावर बाजेवर झोपले होते. सकाळी लवकर उठून ते बाजरीचे सरमाड बांधण्यासाठी गेल्याने सुदैवाने जीवितहानी टळली.